India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY

# अविस्मरणीय जन्मदिवस





२३ ते २५ जुलै २०११ च्या दरम्यान डायमंड ज्युबिली पार्क, तिरुपूर, भारत येथे पूज्य गुरुदेवांच्या ८५ व्या वाढदिवसाचा उत्सव साजरा करण्यात आला. प्रिय गुरुदेवांसोबत राहणे व उत्सवात सहभागी होणे हा एक आनंददायी प्रसंग होता. २० जुलै २०११ रोजी प्रिय गुरुदेवांचे तिरुपूर येथे आगमन झाले. उत्सव स्थळी गुरुदेवांची गाडी प्रवेश करत असताना सर्व अभ्यासी त्यांच्या दर्शनासाठी शांतपणे वाट पहात होते. अभ्यासींच्या एका युवा गटाने एक गीत गाऊन त्यांचे स्वागत केले. गुरुदेवांची गाडी थांबली, गुरुदेवांनी स्वागत गीत ऐकले व त्यांनंतर आपल्या कुटीरामध्ये प्रवेश केला. 'ते आल्यानंतर' संपूर्ण वातावरणच बदलून गेल्याचा अनुभव प्रत्येकास ताबड्तोब आला.

पूज्य गुरुदेवांचे आगमन होईपर्यंत उत्सवस्थळावरील जवळजवळ सर्वच सुविधा तयार व उपलब्ध होत्या. केवळ शेवटचा हात फिरवण्याचे काम बाकी होते. गुरुदेवांचे आगमन होताच स्वयंसेवकांचा जणू पूरच आला आणि प्रत्येकाने आपापले स्थान ग्रहण केले. विविध सेवासुविधा सुरळीतपणे कार्यान्वित झाल्या. रुचि कॅफे मार्फत चालविण्यात येणाऱ्या उपाहारगृहाचे गुरुदेवांनी उद्घाटन केले व त्यानंतर सर्व व्यवस्थांची पाहणी करण्यासाठी त्यांनी परिसरामध्ये फेरी मारली.

## अवाढव्य तयारी

२,००,००० चौरस फुटांच्या भव्य ध्यान कक्षाची उभारणी करण्यात आली होती व सुमारे १०० स्वयंसेवकांनाच्या मदतीने १५०० किलो फुले वापरून ध्यान कक्ष सजविण्यात आला होता. व्यासपीठ मांडणी, पाणी पुरवठा, साफ–सफाई, सजावट, दृक–श्राव्य माध्यम व्यवस्था, सुरक्षा, सुवर्ण पुस्तिका, आदि विविध कार्यक्षेत्रात जवळजवळ ४०० स्वयंसेवक गुंतले होते. संपूर्ण सुसंवाद व सहकार्य आणि गुरुदेवांचे दिव्य मार्गदर्शन यामुळेच एवढे मोठे कार्य पार पाडू शकले. सकाळच्या सत्संगाचे संचालन करुन दि. २२ जुलैला गुरुदेवांनी ध्यानकक्षाचे उद्घाटन केले. त्याप्रमाणे उत्सवाच्या सर्व दिवशी सकाळचा सत्संग गुरुदेवांनीच संचालित केला.










छाया-चित्र प्रदर्शन (फोटो गॅलरी) बरोबरच 'यूथ अवेरनेस बूथ' (वाय ए बी) हे ही एक मोठे आकर्षण होते. या बूथवर सहजमार्गातील युवा वर्ग सहभागी होत असलेल्या विविध उपक्रमांबद्दल माहिती प्रदर्शित करण्यात आली होती. लहान मुलांचे केंद्र एक दुसरे मोठे आकर्षण होते. सर्व वयोगटातील लहान मुलांना विविध हस्तकलांमधे गुंतवून ठेवणारे ठिकाण होते एक विस्तृत असा खास तंबू! मुंबईमध्ये या कार्यक्रमासाठी खास रचलेल्या एका गीताची २००० मुलांकडून उत्सवादरम्यान रंगीत तालीम घेण्यात आली व त्यानंतर गुरुदेवांना पाहण्यासाठी त्याचे प्रत्यक्ष प्रसारण करण्यात आले. जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या मुलांनी एका सुरात केलेले हे सहगायन आश्चर्यचकित करणारे होते.



## संख्या आणि सुविधांचा एक नवा उच्चांक

उत्सवातील अभ्यासींचा सहभाग हा भारावून टाकणारा होता. जवळजवळ ४८००० अभ्यासी (मुलांसह) उत्सव स्थळी उपस्थित होते. आतापर्यंतचा हा अभ्यासींचा सर्वात मोठा मेळावा होता. केवळ अभ्यासींना राहण्यासाठी २०० तंबू उभारण्यात आले होते. याशिवाय 'आराम डॉर्मस' या नावाने अगदी नाममात्र दराने राहण्याची खास सोय मर्यादित लोकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती.



अभ्यासींचा इतका मोठा मेळावा आयोजित करण्यासाठी अनेकविध विभागांमध्ये स्वयंसेवकांनी किती कष्ट घेतले असतील याची केवळ कल्पनाच करता येऊ शकेल. वाहतूक, निवास-व्यवस्था व नोंदणी या विभागांमध्ये काम करणाऱ्या चमूंना परस्पर-सहकार्याने काम करणे अत्यंत महत्त्वाचे होते. निरनिराळ्या ठिकाणांहून बसेस भरुन अभ्यासी समारंभाच्या ठिकाणी येत होते. एक साधी प्रक्रिया उत्तम रितीने राबवून स्वयंसेवकांनी येणाऱ्या अभ्यासींची व्यवस्था सुलभ केली. सर्व स्वयंसेवकांच्या




















चमूंकरिता 'भ्रमण-अन्न-पाणी गाडीची' चोख व्यवस्था अहो-रात्र करण्यात आली होती. या सोयीमुळे प्रत्येक विभागात काम करणाऱ्या स्वयंसेवकांना वेळेवर जेवण व पाणी मिळत होते.

पुस्तक विक्रीकरिता मोठ्या प्रमाणावर तजवीज करण्यात आली होती. सर्व भाषांतील पुस्तकांबरोबच नुकतीच प्रकाशित झालेली पुस्तके सुद्धा विक्रीकरिता उपलब्ध होती.

स्वयंपाकघरात १०० स्वयंसेवक उभे राहून पोळ्या लाटत असलेले दृष्य पाहण्यासारखे होते. जेवण व संध्याकाळचा चहा-नाश्ता यांची व्यवस्था या स्वयंपाकगृहात केली जात होती.

रुग्ण-वाहिका व इतर आपत्कालीन सेवांनी परिपूर्ण असे सुसंघटीत वैद्यकीय केंद्र अभ्यासींच्या सेवेकरिता तत्पर होते. पिण्याच्या पाण्याकरिता तासाला १०,००० लिटर पाणी शुद्ध करू शकणारा आर.ओ. प्रकल्प कार्यान्वित केला गेला होता. प्रसाधन-गृहे स्वच्छ व वापरण्यायोग्य ठेवण्याकरिता स्वयंसेवकांचा एक गट कार्यरत होता. स्वयंपाकगृहात व उपहारगृहात आरोग्य-विषयक काळजी घेतल्याने वैद्यकीय केंद्राला रुग्णांच्या देखभालीचे काम विशेष करावे लागले नाही.

## नव्या अनुशासनाची सुरुवात

दिनांक २३ जुलै रोजी उत्सव कमिटीचे अध्यक्ष बंधू हर्षवर्धन गुप्ता यांनी सकाळच्या सत्संगानंतर स्वागतपर भाषण केले. उत्सवाकरिता तिरुपूरची निवड केल्याबद्दल त्यांनी गुरुदेवांचे आभार मानले व त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली. देशभरातून आलेल्या व समारंभाची पूर्व-तयारी करणाऱ्या स्वयंसेवकांचेही त्यांनी आभार मानले. सिटींगच्या दरम्यान गुरुदेव आपले सर्वस्व प्राणाहुतीच्या स्वरूपात अभ्यासींना अर्पण करतात, त्यामुळे अभ्यासींनी त्यांच्या कुटीरात



खंड ४ विशेष आवृती ऑगस्ट २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र









जाऊन शांतताभंग करु नये असे ते या प्रसंगी म्हणाले.

या भंडाऱ्याकरिता असणारे घोषवाक्य 'प्रेमातील अनुशासन' या वरुन प्रेरणा घेऊन सर्व अभ्यासींना एक निवेदन पाठविण्यात आले होते. गुरुदेवांना असणारी विश्रांतीची आवश्यकता व त्यांच्या मनावरील दडपणापासून मुक्तता याबाबत हे निवेदन होते. या निवेदनाला अभ्यासींनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला. त्यामुळे पूज्य गुरुदेवांना आपले काम करण्याची मोकळीक व दोन सत्संगांदरम्यान पुरेशी विश्रांती मिळाली. सकाळी साडे अकरा वाजता 'प्रेमातील अनुशासन' या उत्सवाच्या घोषवाक्यावर आधारित एक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बंधू चक्रपाणी यांनी प्रथम इंग्रजीत व नंतर तामिळमध्ये अत्यंत प्रेरक असे भाषण केले. या वेळी त्यांनी समुद्रातील जहाजाचे उदाहरण दिले. काही समुद्री प्राणी जहाजाला चिकटतात व त्यामुळे त्याचा वेग मंदावतो. जहाजाला किनाऱ्यावर आणून स्वच्छ करण्याची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे अभ्यासी वर्षभर जडत्वाचा संचय करत असतात आणि उत्सवाच्या वेळी गुरुदेव अभ्यासींना निर्मळ करुन आपापल्या घरी पाठवतात. दिनांक २३ जुलै रोजी संध्याकाळी निरनिराळ्या केंद्रांच्या अभ्यासींनी संगीत व नृत्याचे अनेकविध कार्यक्रम सादर केले.


## गुरुदेवांचा जन्मदिवस

दि. २४ जुलै रोजी ध्यान–कक्षात प्रवेश करण्याआधी पूज्य गुरुदेवांनी पाण्याचा प्रमुख स्त्रोत असणाऱ्या सरोवराला भेट दिली. काठोकाठ भरलेल्या सरोवराकडे पाहून त्यांनी चेष्टेत विचारले, “हे पाणी पुरेसे आहे की आपल्याला पावसाची आवश्यकता आहे?” गुरुदेवांच्या जन्मदिवसाची धून व्हायोलिनवर वाजत असताना त्यांनी ध्यान–कक्षात प्रवेश केला. यानंतर उपस्थित अभ्यासींनी गुरुदेवांकरिता जन्मदिवसाच्या शुभेच्छा देणारे गीत गायले. तुडुंब भरलेल्या, अभ्यासींनी ओसंडणाऱ्या ध्यान–कक्षाकडे पाहून ते उद्गारले “सरोवराप्रमाणेच हा सभामंडप भरलेला आहे!” उत्सवाच्या तीन दिवसांमध्ये पूज्य गुरुदेवांनी २८ विवाह संपन्न केले. गुरुदेवांच्या जन्मदिवशी भगिनी रंजना मेहता व बंधू गुरप्रीत यांनी हृदयस्पर्शी अशी भजने सादर केली. ती ऐकत असताना अनेकांना आपले अश्रू थोपविता आले नाहीत. यानंतर गुरुदेवांनी उपस्थितांना संबोधित केले.

बंधू पी.आर. कृष्णा यांनी २४ जुलै रोजी सायंकाळच्या सत्संगाचे संचालन केले. यावेळी आकाश मेघांनी भरून आले व सत्संगादरम्यान मेघ–गर्जना ऐकू येऊ लागल्या. सत्संग संपताक्षणी मुसळधार पावसाला सुरुवात झाली. यानंतर झालेला भगिनी जयंति कुमारेसन यांच्या वीणा–वादनाच्या कार्यक्रमाने श्रोत्यांना सुमारे दोन तास मंत्रमुग्ध केले. गुरुदेवांनी आपल्या कुटीरातून सी.सी.टी.व्ही. द्वारे या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.









आपल्याला कल्पना असेलच की अभ्यासींच्या भेटी–गाठी घेणे हे पूज्य गुरुदेवांना अवघड होत आहे. तरीसुद्धा अभ्यासींच्या काही समुदायांना भेटण्याकरिता त्यांनी प्रयत्नपूर्वक वेळ काढला. गुरुदेवांनी आफ्रिका, नेपाळ, श्रीलंका, अमेरिका, युरोप इत्यादि ठिकाणांहून आलेल्या अभ्यासींच्या भेटी घेतल्या. केवळ बैठकी घेण्यापेक्षा अभ्यासींनी स्वत:वर व इतरांवर काम करणे महत्त्वाचे आहे अशी टिप्पणी यावेळी झालेल्या एका बैठकीत गुरुदेवांनी केली. तसे केल्याने बैठकी घेण्यात काही अर्थ आहे, अन्यथा नाही असे सांगून गुरुदेवांनी एका समुदायाला प्रथम काम करुन पुढील वेळी भेटण्याची प्रेरणा दिली.

## समर्पक शेवट

उत्सवातील शेवटचा सत्संग पूज्य गुरुदेवांनी दि. २५ जुलै रोजी संचालित केला. भगिनी निहारिका यांनी आपल्या भावना भक्तीमय कवितांमधून सादर केल्या. हे सादरीकरण हृदयापासून केलेले होते आणि प्रत्येक उपस्थिताला या काव्यगायनातून प्रेमाची बरसात होताना जाणवत होती. बंधू पी.आर. कृष्णा यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात 'प्रेमातील अनुशासन' या घोषवाक्याला स्पर्श केला. ते पुढे म्हणाले की या उत्सवादरम्यान अभ्यासींनी प्रेमातील अनुशासनाचा अंगिकार केला आहे आणि आपल्या आचरणाने गुरुदेवांना प्रसन्न केले आहे. आपल्या आयुष्यातील तीन प्रमुख समस्या म्हणजे पूर्वग्रह, अपेक्षा व दुसऱ्यांना जोखण्याची वृत्ती. या समस्यांच्या मुळाशी आहे आपला अहंकार. गुरुदेवाना त्यांच्या वर्तमान स्थितीकडे घेऊन जाणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आज्ञापालन. या भाषणाने उत्सवाची सांगता झाली, परंतु याच्या स्मृति आपल्या हृदयात कायमच्या दरवळत राहतील.












## पूज्य गुरुदेवांच्या भाषणातील निवडक भाग



.... बंधू गुरप्रीत आत्ता गायले ... गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने प्रत्येक क्षण हा नवीन पहाटेसमान असतो. आपल्या सकाळी तरी नवीन पहाटा असतात का? की आपण प्रत्येक सकाळी शोक व्यक्त करीत असतो? मी सकाळी का उठतो आहे? आज मी नेमकं काय करणार आहे? अनेक वर्षांच्या, अनेक जन्मांच्या समस्या मी सोडवल्या नाहीत, तर ही सकाळ वेगळी कशी असेल? आजही मला रडत-भेकत परमेश्वराकडे तक्रार केली पाहिजे-" मला या परिस्थितीत का ठेवले आहेस?"

.... स्वत:खेरीज दुसऱ्यांक रिता आपण काय करतो? आपण आजही आपापली घरे स्वच्छ करुन कचरा रस्त्यावर फेकत नाही का? आपल्या मुलांना रस्त्याच्या कडेला प्रात:विधीला बसवत नाही का? सिगारेटी, कागद रस्त्यात फेकून, रस्त्यात थुंकून आपण 'हरित पर्यावरणाच्या' गोष्टी करत नाही का? आपण वृक्षतोड करत नाही का? आपल्या नद्या दूषित करीत नाही का? आपल्याला कल्पना असेल की पुराणकाळातील वेदांमध्ये असे काही भाग होते की ज्यात मनुष्याने पर्यावरणाची देखभाल करावी असे म्हटले आहे. त्याने वृक्षांची कत्तल करु नये, तर पूजा करावी असे त्यात सांगितले गेले आहे. वृक्षांखेरीज प्राणवायू नसेल व वातावरणाचे शुद्धिकरण होणार नाही. जळणासाठी लाकडे हा वृक्षांचा उपयोग नसून, कार्बन डाय ऑक्साईडने आपण दूषित केलेले वातावरण शुद्ध करणे हे वृक्षांचे कार्य आहे. आपल्या प्रत्येक उ:श्वासाबरोबर आपण हा वायू वातावरणात सोडत असतो. आपण दूषित करणारे असूनही मोठमोठ्या गोष्टी करतो- 'आपण उत्क्रांतीचा शिखरावर आहोत' अशा बाता करतो. मानवप्राणी उत्क्रांतीची 'शिकार' नसला तरी शिखरावर नक्कीच नाही.


.... या पवित्र भूमीमध्ये, जेथे वेदांचा जन्म झाला, जेथे गंगा नदी अस्तित्वात आहे, या पावन भूमीत.... ही जी काही परिस्थिती आहे त्याकरिता आपल्यापैकी प्रत्येक जण जबाबदार आहे या गोष्टीकडे मला आपले लक्ष वेधायचे आहे. आपण मोठे दावे करतो. आपण आपल्या परीने परंपरा जीवित ठेवण्याचा काही प्रयत्न करीत आहोत का? आपण वेदांच्या आदेशांचे पालन करतो का? सहानुभूती, क्षमा, प्रेम, विभागून घेणे, दुसऱ्यांचे शोषण न करणे, केवळ स्वत:करिता नाही तर दुसऱ्यांकरिता काम करणे या मानवी आयुष्याच्या मूलभूत आवश्यकतांसाठी आपण काही करतो का? खरे तर आध्यात्मिकता सांगते, 'स्वत:ला विसरा' दुसऱ्यांसाठी आपण जे करता ते अखेरीस तुमच्याकडे परत येते. अखेरीस म्हणजे युगाच्या शेवटी नव्हे. सर्व प्राचीन विज्ञाने, गूढ शास्त्रे सांगतात की तुमची कृति, तुमचे विचार संपूर्ण विश्वात फिरून तुमच्याकडेच परत येतात. तुम्ही प्रेम केलेत, तर प्रेम परत येईल. दान केले, तर ते परत येईल. पण आज आपण काय करीत आहोत? केवळ घेत आहोत, केवळ घेत आहोत.



.... 'दगड हा दगड असतो' असे एक वचन आहे. तुम्ही त्याला लाथ मारु शकता, किंवा फेकू शकता. परंतु जेव्हा तुम्ही त्याला मंदिरात ठेवता तेव्हा तुम्ही त्याचे सेवक बनता. आपले दगड, आपली संपत्ती, आपली भक्ती आपण कुठे ठेवत आहोत याची जाणीव ठेवा. सावध व्हा. कारण आजचे जग जर येवढे वाईट असेल तर भविष्यातले, पाच वर्षांनंतरचे जग कसे असेल? तुमची मुले-नातवंडे पाच वर्षांनी मोठी झाली असतील, बालकांचे तरुणांमध्ये रूपांतर झालेले असेल व तुम्ही स्वत: वार्धक्याला सामोरे जात असाल. 'हे जग, जसे आज आहे तसे, मी निर्माण केले आहे, बेटा, तू असे करु नकोस' हे सांगण्याचे धैर्य त्यावेळी तुमच्याकडे नसेल. आपल्यामधील अनेकांकरिता आध्यात्मिकता ही एक वाया गेलेली गोष्ट आहे. आपण येथे मौज-मजेसाठी, संगीताचा आस्वाद घेण्यासाठी, उत्तम अन्न सेवन करण्यासाठी येतो. आपल्यापैकी किती जण तळमळीचे उमेदवार (मुमुक्षू) आहेत?

.... 'सत्य' हे असे कडू औषध आहे की त्याला साखरेचे आवरण दिल्याचा काही फायदा होत नाही. अत्यंत कडू अशा सत्याकरिता तयार रहा, जे तुम्हाला आपल्या अंतरंगातून जाणवेल. सायंकाळच्या शुद्धिकरणाच्या वेळी आपण स्वत:कडे पाहतो का? निद्रेपूर्वीच्या प्रार्थनेत पूज्य बाबूजींनी संगितल्याप्रमाणे त्याच त्याच चुका टाळण्याचा आपण निर्धार करतो का? की आपण केवळ निर्जीवपणे गुरुदेवांची प्रार्थना करतो? ही हसण्यावारी नेण्याची गोष्ट नसून गंभीरपणे विचार करण्याची आहे.

.... निसर्गाच्या शक्ती जेव्हा जागृत होतात, पक्षी, प्राणी व मुंग्यांनासुद्धा त्याची जाणीव होते पण मनुष्याला ते समजत नाही. आपण सेस्मोग्राफ, दूर-चित्रवाणीवरील बातम्या (ज्या बऱ्याचशा खोट्या असतात) यांवर विश्वास ठेवतो. हृदयामध्ये काय आहे ते आपण पहात नाही? हृदय आपल्याला संकटाची पूर्वसूचना देते का? जेव्हा आपण भ्यायलेले असू, जेव्हा आपण पथभ्रष्ट होत असू तेव्हा आपण हृदयात डोकावले पाहिजे. पूज्य बाबूजी म्हणत असत, "मनावर विसंबू नका. ते केवळ एक विचार करण्याचे, माहिती देण्याचे साधन आहे. चूक वा बरोबर हे ते सांगू शकत नाही. शंका-निरसनासाठी हृदयाकडे वळा. "बाबूजी महाराजांचे आशीर्वाद आपणा सर्वांना लाभोत ही माझी प्रार्थना!"

# नवीन प्रकाशने



गुरुदेवांनी याप्रसंगी ब–याच पुस्तकांचे व सीडींचे प्रकाशन केले. त्यापैकी काहिंची नावे खालील प्रमाणे :

**टेल्स ऑफ़ वंडर भाग १**
तामिळ, तेलुगु, हिंदी


**कंप्लीट वर्क्स ऑफ़ रामचंद्र**
भाग १ हिंदी

**अध्यात्मिकता कशासाठी?**
इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलुगु, गुजराती, कानडी, मराठी, नेपाळी, जर्मन, इटालियन, पोर्तुगीज, स्पेनिश


**डाऊन मेमरी लेन**
दूसरी आवृती




**अंडर्स्टॅंडींग स्पिरिच्युऐलिटी**
(५ डीव्हीडींचा संच)




**प्रशिक्षक डीव्हीडी संच भाग २**
(आजीवन सभासदत्व नसलेले)





**इनर रिफ़्लेक्शन्स भाग १**
सत्संगानंतर करावयाच्या अवलोकनावरील भाष्य




**सद्गुरु आणि ध्येय**
तमिळ, तेलुगु, कानडी, मल्ल्याळम, मराठी, गुजराती




**धर्म आणि आध्यात्मिकता**
तमिळ





**युथ भाग १**
इटालियन




**सत्योदय**
मल्ल्याळम





**हृदयीचे बोल २००९**
स्पेनिश




**हृदयीचे बोल २००७**
हिंदी




**हृदयीचे बोल २००२ भाग १** इंग्रजी




**टेल्स ऑफ़ वंडर भाग २**
इंग्रजी